**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अधिसभा निवडणूक २०२२
## नोंदणीकृत पदवीधारकांना नाव नोंदणीकरिता मुदतवाढ
## ३० जुलै पर्यंत भरता येईल अर्ज

अमरावती : (१९.०७.२०२२)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १३१ मधील तरतूदीनुसार उन्हाळी - २०२१ पर्यंत फक्त या विद्यापीठातील म्हणजेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर डॅशबोर्डवरील इलेक्शन पोर्टल २०२२ मध्ये दिलेल्या लिंकच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने तसेच महाराष्ट्र शासनाने एकरुप परिनियम क्र. २/२०१७ द्वारे विहित केलेल्या नमुना अर्जामध्ये दि. १ ते २० जुलै, २०२२ या कालावधीत अर्ज मागविण्यात आले होते. तद्वतच सदर अर्जाची संगणकीय प्रत (हार्ड कॉपी) आवश्यक दस्तावेज व विहित शुल्कासह विद्यापीठात सादर करण्याकरिता दि. २२ जुलै, २०२२ ही तारीख निश्चित करण्यात आली होती.

### नाव नोंदणीकरिता मुदतवाढ

नोंदणीकृत पदवीधारकांना नाव नोंदणीकरिता मुदतवाढ देण्यात आली असून इच्छुक पदवीधारकांना आपले अर्ज आवश्यक दस्तावेज व शुल्कासह दि. ३० जुलै, २०२२ पर्यंत ऑनलाईन भरता येईल. तसेच सदर भरलेले अर्ज दि. १ ऑगस्ट, २०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या केंद्रीय आवक शाखेत सादर करावयाची आहेत.

विहित मुदतीनंतर आलेले तसेच अपूर्ण अर्ज कोणत्याही परिस्थितीत विद्यापीठाकडून स्वीकारले जाणार नाहीत. तद्वतच यासंदर्भात संबंधित अर्जदारांसोबत कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे कुलसचिव तथा निवडणूक निर्वाचन अधिकारी डॉ. तुषार देशमुख यांनी विद्यापीठाच्यावतीने कळविले आहे. अधिक माहितीसाठी उपकुलसचिव श्री प्रमोद तालन (९९२२९९३२७३) व सहा. कुलसचिव श्री आर.जे. सयाम (९४२३६४९३४६) यांचेशी संपर्क साधता येईल.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**

दि. १९/०७/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 173

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/